# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

## प्रवेश सुचना

क्र.सअ/निकृशि/ग्रा.शि.स. प्रवेश/223/२०१५–२०१६ दिनांक : 19/6/2015

या विद्यापीठांतर्गत खालील शिक्षण संस्था मार्फत एस.एस.सी. (१०वी) परिक्षा उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांकडून कृषि विज्ञान पदविका अभ्यासक्रमासाठी वर्ष **२०१५–२०१६** करीता प्रवेशासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रवेश प्रक्रियेची संपूर्ण माहिती विद्यापीठाच्या **http://www.pdkv.ac.in** या संकेतस्थळांवर आणि संबधीत ग्रामीण शिक्षण संस्थेत विक्रीस उपलब्ध असलेल्या माहिती पुस्तिकेत देण्यात आलेली आहे. कृषि विज्ञान पदविका धारक या विद्यापीठातील तसेच इतर विद्यापीठातील काही पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रथम वर्षास प्रवेश घेण्यास पात्र ठरतात.

**अ) अभ्यासक्रम – व्दिवर्षीय कृषि विज्ञान पदविका**

| शिक्षण संस्था | अर्जदाराची पात्रता |
|---|---|
| १. ग्रामीण शिक्षण संस्था (कृषि विज्ञान शाखा) अमरावती. | अमरावती राजस्व विभागातील रहिवाश्यांसाठी (यवतमाळ, अमरावती, वाशीम, अकोला व बुलढाणा जिल्हे) |
| २. ग्रामीण शिक्षण संस्था (कृषि विज्ञान शाखा) पिपरी वर्धा. | नागपूर राजस्व विभागातील रहिवाश्यांसाठी (नागपूर, भंडारा, वर्धा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हे) |

वरील अभ्यासक्रमासाठी विहीत अर्ज व माहीतीपत्रक **दि. २२/०६/२०१५** पासून आपआपल्या राजस्व विभागातील ग्रामीण शिक्षण संस्थांमधून रु. १००/– (रु. शंभर फक्त) नगदी भरुन मिळू शकेल किंवा रु. १००/– ची पोष्टल ऑर्डर आणि स्वतःच्या नावाचा पूर्ण पत्ता असलेला व रु. १५/– पोष्टाची तिकीटे लावलेला १३ x २८ से. मि. आकाराचा लिफाफा संबंधीताकडे (प्राचार्य, ग्रामीण शिक्षण संस्था यांचे नावे) पाठवून पोष्टाने प्राप्त करता येईल. **ज्या संस्थेतून अर्ज विकत घेतला असेल त्याच संस्थेत तो सादर करावा लागेल**. संपूर्ण भरलेला अर्ज संबंधीत कागदपत्रासह पंजीयन शुल्क रु. १०/– (रु. दहा फक्त) नगदी भरुन किंवा पोष्टल ऑर्डरसह **दि.०७/०७/२०१५** पर्यंत सादर करावा. उशिरा सादर केलेल्या/प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

**कुलसचिव**
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला.